# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः01.05.2025** **वारःगुरुवार**

---

1 ) जागतिक दृक्-श्राव्य मनोरंजन परिषद 2025 अर्थात वेव्हजसाठी मुंबई सज्ज; आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्‌घाटन

2)आगामी जनगणनेत जातनिहाय गणना करण्याचा केंद्र सरकारचा निर्णय

3) 66व्या महाराष्ट्र दिनाचा राज्यात उत्साह; गुजरातचाही आज स्थापना दिन

4)आकाशवाणी पुणे केंद्राच्या प्रादेशिक वृत्त विभागाचा आज सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन

आणि,

5) पाकिस्तानी विमानसेवांसाठी भारताची हवाई हद्द 23 मे पर्यंत बंद

**<u>वेव्हजमुंबई</u>**

जागतिक दृक् श्राव्य मनोरंजन परिषद 2025 अर्थात वेव्हज चं उद्‌घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मुंबईत होणार आहे. चार दिवस चालणाऱ्या या परिषदेचा उद्देश, माध्यमं, मनोरंजन आणि डिजिटल नवोन्मेष क्षेत्रातली भारताची प्रतिभा अधोरेखित करणं तसंच तरुणांसाठी नवनिर्मितीच्या अभिनव संधी उपलब्ध करून देणं आणि त्यांना व्यासपीठ देणं, असा आहे. वेव्हज २०२५ या परिषदेत माध्यमं, मनोरंजन आणि तंत्रज्ञान क्षेत्रातल्या आघाडीच्या व्यक्ती, कंपन्या आणि या क्षेत्रात येऊ पाहणारी नवी प्रतिभा एकत्र येणार आहे. पहिलाच जागतिक माध्यम संवाद या परिषदेत होणार असून ,सर्जक आर्थिक क्षेत्राला चालना देण्यासाठी सर्वसमावेशक वेव्हज बाजारचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या वर्षभराच्या कालावधीत देशभरात झालेल्या ३२ क्रिएट इन इंडिया चॅलेंजमधून निवडलेल्या स्पर्धकांचा क्रिएटो स्फिअर हेही वेव्हज परिषदेचं आकर्षण आहे. ‘कला टू कोड’ या विषयावर आधारित भारत पॅव्हिलियनमध्ये कला, कृती, दृष्टी आणि क्रिएटर्स लीप या चार विभागांद्वारे भारताची समृद्ध कथाकथन परंपरा नागरिकांना अनुभवता येईल. याशिवाय विविध प्रदर्शनं, दालनं, सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेलही वेव्हज परिषदेत असणार आहे.

परिषदेच्या उद्‌घाटनानंतर पंतप्रधान केरळला रवाना होणार असून, तिथं विळिंजम आंतरराष्ट्रीय बंदराचं लोकार्पण करणार आहेत. त्यानंतर आंध्र प्रदेशात अमरावती इथं ते ५८ हजार कोटी रुपयांच्या विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. सात राष्ट्रीय महामार्ग प्रकल्पांचं उद्‌घाटनही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**<u>पंतप्रधानप्रगतीबैठक</u>**

केंद्र आणि राज्य सरकारांचा सहभाग असलेल्या प्रगती या तंत्रज्ञान आधारित मंचाची 46वी बैठक पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झाली. या बैठकीत रस्ते प्रकल्प, रेल्वे आणि बंदर, नौवहन आणि जलमार्गाच्या प्रत्येकी दोन प्रकल्पांसह आठ महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. विविध राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये असलेल्या या प्रकल्पाचा खर्च  सुमारे ९० हजार कोटी रुपये आहे. लाभार्थ्यांची ओळख बायोमेट्रिक्सच्या आधारे काटेकोरपणे करण्याचे निर्देश पंतप्रधानांनी सर्व मंत्रालयं आणि विभागांना दिले. पंतप्रधान मातृवंदना योजनेत अतिरिक्त कार्यक्रमांचा समावेश करण्या संदर्भातल्या सूचनाही त्यांनी दिल्या ,यामध्ये बालसंगोपनाला प्रोत्साहन,आरोग्य आणि स्वच्छतेच्या पद्धतींमध्ये सुधारणा आदी बाबींचा समावेश आहे.

**<u>जनगणना</u>**

आगामी जनगणनेत, जातनिहाय गणना करण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या राजकीय व्यवहार विषयक मंत्रिमंडळ समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी बैठकीनंतर, या निर्णयाबद्दल माध्यमांना माहिती दिली. काही राज्यांनी जातनिहाय गणना केली असून, काही राज्यांनी या बाबतीत सर्वेक्षण केलं आहे. पण बहुतांश ठिकाणी असं सर्वेक्षण हे राजकीय दृष्टिकोनातून आणि अपारदर्शक पद्धतीनं करण्यात आलं असल्याचं वैष्णव म्हणाले. अशा सर्वेक्षणांमुळे समाजात संभ्रम निर्माण झाला आहे. या सर्वांचा विचार करून आणि देशाच्या सामाजिक रचनेला राजकारणामुळे अडथळा येऊ नये यासाठी, जातींची गणना जनगणनेत पारदर्शकपणे समाविष्ट करण्याचा निर्णय घेतल्याचं वैष्णव यांनी सांगितलं. 2025-26 च्या साखर हंगामात शेतकऱ्यांना उसासाठी तीन हजार 550 रुपये प्रति टन FRP म्हणजेच रास्त भाव देण्यालाही कालच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या निर्णयाचा फायदा पाच कोटी ऊस उत्पादक शेतकऱ्यांना तसंच साखर कारखान्यांमध्ये आणि संबंधित सहाय्यक कामांमध्ये काम करणाऱ्या पाच लाख कामगारांना होईल, असं वैष्णव म्हणाले.

**<u>महाराष्ट्रदिन</u>**

महाराष्ट्र राज्याचा 66 वा वर्धापन दिन आज राज्यात उत्साहात साजरा होत आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त ध्वजारोहणाचा मुख्य शासकीय कार्यक्रम राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते आज दादरच्या शिवाजी पार्क इथं होणार आहे.

देशाच्या विकासात महाराष्ट्र महत्त्वाची भूमिका बजावत असून, आपल्या सर्वांच्या प्रयत्नातून, सहकार्यातून आणखी प्रगत, संपन्न महाराष्ट्र साकारण्यासाठी कटिबद्ध होऊया, असं आवाहन करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

राज्यातल्या सर्व जिल्हा मुख्यालयांत आज ध्वजारोहण करण्यात येणार असून, ठिकठिकाणी विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात आज ‘मुख्यमंत्री सहाय्यता कक्षाचं उद्घाटन करण्यात येणार आहे.

आजच आंतरराष्ट्रीय कामगार दिनही साजरा केला जात आहे. कामगारांच्या हक्काबाबत जागृती व्हावी या उद्देशांन आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.
गुजरातस्थापनादिवसपूलमाधुरी

गुजरात राज्याचा स्थापना दिनही आज साजरा होत आहे. भाषिक आधारावर मुंबई पासून वेगळे झाल्यानंतर १ मे १९६० रोजी गुजरात राज्य अस्तित्वात आले. गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत आणि मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या उपस्थितीत पंचमहाल जिल्ह्यात स्थापना दिनाचा राज्यस्तरीय सोहळा पार पडणार आहे.

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते पंचमहाल जिल्ह्यात साडे सहाशे कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी होणार आहे. राज्याच्या विकासात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सहा जणांना राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गुजरात गरिमा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

**<u>पुणेकेंद्रसुवर्णमहोत्सव</u>**
आकाशवाणी पुणे केंद्राचा प्रादेशिक वृत्त विभाग आज आपली सुवर्ण महोत्सवी वाटचाल पूर्ण करीत आहे. एक मे 1975 रोजी पुण्याच्या प्रादेशिक वृत्त विभागातून पहिलं बातमीपत्र प्रसारित झालं. ताज्या घटनांचं नेमकं वृत्तांकन, साधी सोपी भाषा, आणि उत्तम सादरीकरण यामुळे या विभागाच्या बातमीपत्रांना अल्पावधीतच लोकप्रियता मिळाली. बदलत्या काळानुसार आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत इथल्या बातमीपत्रांमध्ये अनेक बदल करण्यात आले. कोविड आपत्तीच्या काळात या वृत्त विभागानं तीन राष्ट्रीय बातमीपत्र आणि कोविड विषयीचं विशेष बातमीपत्र प्रसारित केलं.

प्रादेशिक वृत्त विभागाचं विविध समाज माध्यमांवरचं अस्तित्वही लक्षवेधी ठरलं आहे.

दृक्श्राव्य वाहिन्यांच्या गर्दीतही आपल्या विश्वासार्ह आणि निःपक्षपाती कामगिरीमुळे दररोज सेकंदांवर सुरू असलेली प्रादेशिक वृत्त विभागाची ही सुवर्ण महोत्सवी वाटचाल आहे.

**<u>जम्मू-काश्मीर</u>**
केंद्रशासित प्रदेशातील सध्याच्या सुरक्षा परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी जम्मू आणि -काश्मीरचे नायब राज्यपाल मनोज सिन्हा यांच्या अध्यक्षतेखाली काल वरिष्ठ अधिकाऱ्यांची उच्चस्तरीय बैठक झाली. जम्मू-काश्मीरमधून दहशतवाद पूर्णपणे नष्ट करण्यासाठी कठोर उपाययोजना करण्याचे निर्देश सिन्हा यांनी यावेळी दिले. सामान्य नागरिकांसाठी सुरक्षा प्रणाली मजबूत करून, त्यांच्यामध्ये विश्वास निर्माण करणं ही सरकारची प्राथमिकता असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>भारतपाकहवाईहद्द</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानी विमानसेवांसाठी आपली हवाई हद्द बंद केली आहे. हा निर्णय आजपासून 23 मे पर्यंत लागू राहणार आहे. पाकिस्तानमध्ये नोंदणीकृत विमानं , पाकिस्तानी एअरलाइन्सद्वारे चालविली जाणारी, त्यांच्या मालकीची किंवा भाड्यानं घेतलेली विमानं आणि लष्करी विमानांना या कालावधीत भारतीय हवाई हद्द उपलब्ध होणार नाही असे निर्देश नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिले आहेत. पाकिस्तानी विमान कंपन्यांना भारतीय हवाई हद्दीचा वापर करण्याला बंदी घालणारी, नोटीस टू एअरमन जारी करण्यात आली आहे.

**गवईपूलदेवेन**

देशाचे नवे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती भूषण गवई यांची नियुक्ती करण्यात आली आहे. 14 मेपासून ते आपला कार्यभार सांभाळतील, अशी माहिती केंद्रीय कायदा आणि न्यायमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी दिली.

**पोलिसआयुक्त**

मुंबईच्या पोलिस आयुक्तपदी देवेन भारती यांची नियुक्ती करण्यात आली आहे. ते 1994 च्या तुकडीचे आयपीएस अधिकारी असून, मुंबईवरील २६/११च्या हल्ल्याचा तपास करणाऱ्या दहशतवाद विरोधी पथकाचं नेतृत्व त्यांनी केलं होतं.

**राष्ट्रीयविक्रम**

चंडीगड मध्ये झालेल्या दुसऱ्या भारतीय खुल्या रिले स्पर्धेत धावपटू गुरिंदरवीर सिंग, अनिमेष कुजूर, मणिकांत होबलीधर आणि अमलान बोरगोहेन यांच्या संघानं पुरुषांच्या ४ बाय १०० मीटर रिले प्रकारात राष्ट्रीय विक्रम मोडला. त्यांनी ३८ पूर्णांक ६९ सेकंद इतका वेळ नोंदवत या प्रकारात नवा विक्रम प्रस्थापित केला. यापूर्वी दिल्लीच्या राष्ट्रकुल स्पर्धेत ३८ पूर्णांक ८९ सेकंदाचा विक्रम नोंदवण्यात आला होता.

**क्रिकेट**

आय पी एल क्रिकेट स्पर्धेत काल चेन्नई सुपर किंग्ज संघाचा पंजाब किंग्ज इलेव्हन संघानं 4 गडी राखून पराभव केला. या पराभवामुळे चेन्नईचा संघ स्पर्धेतून पडणारा पहिला संघ ठरला आहे.चेन्नईच्या 190 धावांना प्रत्युत्तर देताना पंजाबनं 194 धावा केल्या.पंजाबकडून यजुवेंद्र चहलनं एकाच षटकात हॅट्रिकसह 4 गडी बाद केले.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं .

## नमस्कार..